लोकमत

# विद्यापीठाच्या प्रगतीसाठी पाठबळ द्यावे

## डी. टी. शिर्के : शिवाजी विद्यापीठाचा ५८वा वर्धापनदिन उत्साहात

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : हीरकमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या प्रगतीसाठी माजी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, आदी प्रत्येक घटकाने सूचनांसह पाठबळ द्यावे. आपली भूमिका निभावावी. विद्यापीठाचा संशोधन क्षेत्रातील लौकिक अधिक उंचावण्यासाठी शिक्षक, विद्यार्थ्यांनी सर्वतोपरी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी येथे केले.

विद्यापीठाचा ५८वा वर्धापनदिन कोविडच्या पार्श्वभूमीवर साधेपणाने साजरा करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रांगणात सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या ध्वजाला वंदन करण्यात आले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. मान्यवरांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांनी ऑनलाईन संवाद साधला. कोविडने आपल्यातील क्षमता व मर्यादांची जाणीव करून दिली आहे. ऑनलाईन अध्ययन-अध्यापन प्रणालीपासून सुटका होऊन प्रत्यक्ष अध्यापन प्रक्रियेस लवकर सुरुवात होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र, विद्यापीठ अनुदान आयोग आणि शासन यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्याला टप्प्याटप्प्याने अनलॉकची प्रक्रिया राबवावयाची असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, डॉ. आर. के. कामत, एस. एस. महाजन, पी.आर. शेवाळे, ए. एम. गुरव, एम. एस. देशमुख, आर. व्ही. गुरव, नमिता खोत, पी. टी. गायकवाड, अभय जायभाये, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५८व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमावेळी सर्व उपस्थितांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

### 'शिव वार्ता'चे लोकार्पण

वर्धापनदिनाच्या निमित्ताने मुख्य प्रशासकीय इमारत, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा असणारा उद्यान परिसर या ठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दरम्यान, विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' या यूट्यूब चॅनलचे लोकार्पण कुलगुरु डॉ. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले.

लोकमत

# उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी समिती

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह व नवीन शैक्षणिक धोरण यांना अनुसरून उच्च शिक्षणातील नवे प्रवाह सामावून घेण्यासाठी तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने येत्या तीन महिन्यांमध्ये अंतरिम अहवाल करावयाचा आहे, असे उच्च शिक्षण विभागातर्फे कळविण्यात आले.

महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी राज्य शासनातर्फे डॉ.सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली असून त्यात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. रंजन वेळूकर, डॉ.विजय खोले, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी.टी. साबळे, मुंबई विद्यापीठाचे माजी उपकुलगुरू डॉ. नरेशचंद्र, उच्च न्यायालयातील वकील हर्षद भडभडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वरिष्ठ कायदा अधिकारी डॉ.परविन सय्यद, शासकीय विधी महाविद्यालयातील डॉ. रचीता एस राथो, मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य शितल देवरुखकर शेठ, दत्ता मेघे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. प्रसाद थोडे, राज्याचे तंत्रशिक्षण संचालक डॉ.अभय वाघ हे या समितीचे सदस्य आहेत.

तर राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ.धनराज माने हे सदस्य सचिव आहेत. या समितीला सर्व प्रकारचे प्रशासकीय सहाय्य करण्याची तसेच समितीसाठी येणार सर्व खर्च करण्याची जबाबदारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठावर सोपवण्यात आली आहे.

कायद्यातील सुधारणांबाबत ४ डिसेंबरपर्यंत सूचना मागवल्या

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक ,संघटना, विद्यार्थी, पालक, समाजातील इतर घटक यांच्याकडून सूचना मागविण्यात आल्या आहेत.

सदर सूचना या www.unipune.ac.in संकेतस्थळावर अँड मेंमेट टू द महाराष्ट्र पब्लिक युनिव्हसिटी अॅक्ट या लिंक वर येत्या ४ डिसेंबर पर्यंत स्वीकारल्या जातील.

लोकमत

शिवाजी विद्यापीठाकडून मोजमाप

# गतवर्षीपेक्षा यंदा दिवाळीत ध्वनिप्रदूषणात किंचित वाढ

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : यंदाच्या दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजन दिवशी सायंकाळी साडेसहा ते रात्री साडेनऊ यावेळेत गेल्यावर्षीच्या तुलनेत विविध भागांमध्ये फटाक्यांचा आवाजासह ध्वनिप्रदूषण किंचित प्रमाणात वाढले. औद्योगिक क्षेत्र वगळता इतर सर्व क्षेत्रांमध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्ड (सीपीसीबी)च्या मानांकनापेक्षा आवाजाची पातळी जादा राहिली.

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने यावर्षी औद्योगिक, व्यावसायिक, रहिवासी आणि शांतता क्षेत्रनिहाय शहरातील २२ ठिकाणी शनिवार ते सोमवार दरम्यान पाहणी केली. सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत ध्वनिप्रदूषणाच्या नोंदी घेतल्या. त्याची माहिती पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी बुधवारी दिली.

औद्योगिक क्षेत्रातील शिवाजी उद्यमनगर, वाय. पी. पोवारनगर परिसर वगळता व्यावसायिक, रहिवासी, शांतता क्षेत्रात आवाजाने मर्यादा ओलांडली असल्याचे दिसून आले. दिवाळीतील इतर दिवसांपेक्षा लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आवाजाच्या पातळीत वाढ झाली. माजी विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, अजय गौड, योगेश गलगले, अनिकेत मोराळे, सौरभ पोवार यांनी ध्वनीपातळी मोजण्याचे काम केले.

## गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी फटाक्यांचा आवाज (डेसिबलमध्ये)

| शहरातील ठिकाणे | २०१९ | २०२० |
|---|---|---|
| सीपीआर | ५२.७६ | ५४.०० |
| न्यायालय | ५०.६३ | ५४.७९ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ५५.३५ | ५६.३७ |
| शिवाजी विद्यापीठ | ५०.५४ | ५१.१२ |
| राजारामपुरी (रहिवासी) | ५३.३१ | ५५.०९ |
| शिवाजी पेठ | ५५.५६ | ५८.६८ |
| नागाळा पार्क | ५२.९६ | ५३.९२ |
| मंगळवार पेठ | ५३.८५ | ५६.७२ |
| राजारामपुरी (व्यावसायिक) | ५८.५२ | ६०.६३ |
| शाहूपुरी | ५९.०३ | ६३.५३ |
| लक्ष्मीपुरी | ५८.३१ | ५९.७० |
| महाद्वार रोड | ६०.३३ | ६३.६७ |
| मिरजकर तिकटी | ५८.३८ | ५९.३५ |
| गंगावेश | ६०.४० | ६०.३८ |
| बिंदू चौक | ६१.६७ | ६२.८८ |
| शिवाजी उद्यमनगर | ५९.६१ | ५९.०४ |



### मर्यादा अशा

| क्षेत्र | रात्री | क्षेत्र | रात्री |
|---|---|---|---|
| औद्योगिक | ७० | रहिवासी | ४५ |
| व्यावसायिक | ५५ | शांतता | ४० |



## गणेशोत्सवापेक्षा अधिक आवाज

गेल्यावर्षीपेक्षा यंदा ध्वनिप्रदूषण वाढले, पण त्याचे प्रमाण फार नाही. फटाक्यांसह गजबजलेल्या बाजारपेठा, वर्दळ, वाहनांच्या आवाजाचा ध्वनिप्रदूषणामध्ये समावेश आहे. यंदाच्या गणेशोत्सवादरम्यानच्या आवाजापेक्षा दिवाळीत अधिक आवाज राहिला. अनलॉक प्रक्रियेचा परिणाम दिसल्याचे डॉ. आसावरी जाधव यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५८व्या वर्धापनदिनी मुख्य प्रशासकीय इमारतीस करण्यात आलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने सारा परिसर झळाळून गेला होता. (छाया : पांडुरंग पाटील)

सकाळ

# विद्यापीठाचा संशोधनातील लौकिक वाढवा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : 'शिव वार्ता' यूट्यूब चॅनेलचे लोकार्पण

कोल्हापूर, ता. १८ : संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आपला झेंडा जागतिक पातळीवर फडकविला आहे. विद्यापीठाचा संशोधन क्षेत्रातील लौकिक अधिक उंचावण्यासाठी संशोधक शिक्षक व विद्यार्थ्यांनी सर्वोतोपरी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात आज ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिना निमित्त मुख्य इमारतीला आकर्षक विद्यूत रोषणाई केली आहे.

शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन दिन आज कोविड- साथीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात आला. विद्यापीठ प्रांगणात सकाळी ठीक साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. कुलगुरू डॉ. शिर्के व मान्यवरांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले व शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ''विद्यापीठ अनुदान आयोग आणि महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सूचना बरहुकूमच आपल्याला टप्प्याटप्प्याने अनलॉकची प्रक्रिया राबवावयाची आहे. या प्रक्रिये दरम्यान विद्यापीठ व महाविद्यालये विविध उपक्रम घेऊन सामोरे येतील, ज्यायोगे शिकणे व शिकवणे अधिक सुलभ होईल.'' सदर कार्यक्रमानंतर शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' या युट्यूब चॅनलचे लोकार्पण डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, जी. आर. पळसे, डॉ. आर.के. कामत, डॉ. एस.एस. महाजन, डॉ. पी.आर. शेवाळे, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. एम.एस. देशमुख उपस्थित होते.

Kolhapur, Main
19/11/2020 Page No. 9



कोल्हापूर : ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला केलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : रियाज ट्रेनर)

# संशोधनाचा झेंडा जागतिक पातळीवर

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे गौरवोद्गार : विद्यापीठाचा ५८ वा वर्धापन दिन साधेपणाने

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आपला झेंडा जागतिक पातळीवर फडकविला आहे. विद्यापीठाचा संशोधन क्षेत्रातील लौकिक अधिक उंचावण्यासाठी संशोधक शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सर्वोतोपरी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

**विद्युत रोषणाईने झगमगले विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त मुख्य प्रशासकीय इमारत तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा असणाऱ्या उद्यान परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दीपावली आणि वर्धापन दिन असा योग या निमित्ताने जुळून आला.

शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या वर्धापनदिनी विद्यापीठाच्या प्रांगणात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

युट्यूबद्वारे मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, कोरोनाचा धोका टाळण्यासाठी विद्यार्थ्यांविना साध्या पद्धतीने वर्धापन दिन साजरा केला आहे. ऑनलाईन अध्ययन-अध्यापन प्रणालीपासून सुटका होऊन प्रत्यक्ष अध्यापन प्रक्रियेस लवकर सुरवात होईल, अशी अपेक्षा आहे. विद्यापीठ अनुदान आयोग आणि महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे टप्प्याटप्प्याने अनलॉकची प्रक्रिया राबवावयाची आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, मानव्यविद्या विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. आर. शेवाळे, कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसी संचालक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, अभय जायभाये आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : वर्धापनदिनी ध्वजारोहण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. नमिता खोत, डॉ. पी. टी. गायकवाड आदी.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा वर्धापनदिन साजरा

## साधेपणाने कार्यक्रम; संशोधन क्षेत्रातील लौकिक उंचावण्यासाठी योगदान द्या : कुलगुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आपला झेंडा जागतिक पातळीवर फडकविला आहे. विद्यापीठाचा संशोधन क्षेत्रातील लौकिक अधिक उंचावण्यासाठी संशोधक शिक्षक व विद्यार्थ्यांनी सर्वोतोपरी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा वर्धापनदिन बुधवारी साधेपणाने पण उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यापीठ प्रांगणात सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. डॉ. शिर्के व मान्यवरांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन व शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

यानंतर यू ट्यूबद्वारे ऑनलाईन स्वरुपात डॉ. शिर्के यांनी सर्वांशी संवाद साधला. ते म्हणाले, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आजचा वर्धापन दिन साधेपणाने आणि विद्यार्थ्यांविना साजरा होत आहे. कोरोनाने आपल्याला क्षमता व मर्यादांची जाणीव करून दिलेली आहे. विशेषत: ऑनलाईन शिक्षणाच्या बाबतीत या ऑनलाईन अध्ययन-अध्यापन प्रणालीपासून सुटका होऊन प्रत्यक्ष अध्यापन प्रक्रियेस लवकरात लवकर सुरुवात होईल.

विद्यापीठाच्या 'शिव वार्ता' या यू ट्यूब चॅनलचे लोकार्पण डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, मानव्यविद्या विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. आर. शेवाळे, कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसी संचालक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये यांच्यासह अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्या परिषद सदस्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### विद्युत रोषणाईने उजळले विद्यापीठ

वर्धापन दिनाच्या निमित्ताने मुख्य प्रशासकीय इमारत तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा असणारा उद्यान परिसर याठिकाणी अत्यंत आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दीपावली आणि वर्धापनदिन असा योग या निमित्ताने जुळून आला. सध्या कोरोनामुळे विद्यापीठ परिसरात अभ्यागतांना प्रवेश करता येत नसला तरी मुख्य इमारतीसमोरून या रोषणाईचे नेत्रसुखद दर्शन नागरिकांनी रात्री घेतले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते बुधवारी ध्वजवंदन करण्यात आले. (छाया: पप्पू आत्तार)**

Kolhapur Edition
Nov 19, 2020 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# दिवाळीत ध्वनी प्रदूषणाचा आलेख चढताच

- गतवर्षीच्या तुलनेत ध्वनी प्रदूषणात काही प्रमाणात वाढ
- औद्योगिक क्षेत्र वगळता सर्व क्षेत्रांमध्ये आवाजाची पातळी जास्त
- गणेशोत्सवापेक्षा दिवाळीत अधिक ध्वनी प्रदूषण
- शिवाजी विद्यापीठाच्या सर्वेक्षणातून माहिती समोर
- शहरातील २२ ठिकाणांवर केले सर्वेक्षण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

फटाक्यांचा आवाज, गजबजलेल्या बाजारपेठा आणि वाहनांची वर्दळ यामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा दिवाळीमध्ये लक्ष्मी पूजनावेळी शहरातील ध्वनी प्रदूषणात काही अंशी वाढ झाल्याचे शिवाजी विद्यापीठाच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे.

दिवाळीत फुटणाऱ्या फटाक्यांमुळे वायू आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होते. यंदा मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर वायू प्रदूषण नियंत्रणात राहावे यासाठी प्रशासनाच्या वतीने फटाके फोडण्यासाठी नियमावली जाहीर केली होती. याचा फारसा परिणाम पाहायला मिळाला नाही. २०२० मध्ये दिवाळीत ध्वनी प्रदूषणाचा आलेख चढता राहिला आहे. गणेशोत्सवादरम्यान असलेल्या ध्वनी प्रदूषणापेक्षा लक्ष्मी पूजनावेळी आवाजाचे प्रमाण अधिक होते.

शहरातील सायलंट, रेसिडेन्शियल व कमर्शियल या क्षेत्रांमध्ये लक्ष्मीपूजनाच्या दिवशी आवाजाची मर्यादा निर्धारित मानकापेक्षा जास्त होती. केवळ इंडस्ट्रियल क्षेत्रामध्ये आवाजाची मर्यादा निर्धारित मानकांच्या आत होती. फटाक्यांबरोबर दिवाळी सनानिमित्त गजबजलेल्या बाजारपेठा, पान ३ वर

**दिवाळी दिवशी घेतलेले आवाजाचे नमुने**
(आवाजाची पातळी डेसिबलमध्ये)

| झोन | ठिकाण | २०१८ | २०१९ | २०२० |
|---|---|---|---|---|
| सायलंट | सीपीआर | ६०.९० | ५२.७६ | ५४ |
| | न्यायालय परिसर | ६२.९० | ५०.६३ | ५४.७९ |
| | जिल्हाधिकारी कार्यालय परिसर | ६१.१० | ५५.३५ | ५६.३७ |
| | शिवाजी विद्यापीठ परिसर | ५२.३० | ५०.५४ | ५१.१२ |
| रेसिडेन्शियल | राजारामपुरी | ५४.५० | ५३.३१ | ५५.०९ |
| | उत्तरेश्वर पेठ | ६२.८० | ६१.६५ | ५८.५७ |
| | ताराबाई पार्क | ५६.९० | ५४.७८ | ५२.४३ |
| | शिवाजी पेठ | ५८.९० | ५५.५६ | ५८.६८ |
| | नागाळा पार्क | ५५.९० | ५२.९६ | ५३.९२ |
| | मंगळवार पेठ | ५४.७० | ५३.८५ | ५६.७२ |

आयोजन शिवाजी विश्वविद्यालय का 58वां स्थापना दिवस मनाया गया

# रिसर्च में योगदान दें विवि से संबंधित लोग

नवभारत न्यूज नेटवर्क

**कोल्हापुर.** अनुसंधान के क्षेत्र में शिवाजी विश्वविद्यालय का नाम पूरे विश्व में जाना जाता है. अनुसंधान की इस विरासत को आगे भी ले जाने के लिए विश्वविद्यालय के सभी प्राध्यापक और छात्र हमेशा प्रयास करते रहें. ऐसी अपील शिवाजी विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के ने की. शिवाजी विश्वविद्यालय का 58 वां स्थापना दिवस सादगी के साथ मनाया गया. विश्वविद्यालय के प्रांगण में कुलगुरु डॉ. शिर्के के हाथों ध्वजारोहण किया गया. इस समय विश्वविद्यालय के संगीत एवं नाट्यशास्त्र विभाग की छात्राओं ने राष्ट्रगीत और महाराष्ट्र गीत पेश किया. डॉ. शिर्के के हाथों छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा का पूजन किया गया.




## अधिकारियों की रही उपस्थिति

जल्द ही हम इस संकट से उबरकर फिर से विश्वविद्यालय में अनुसंधान का कार्य शुरू होगा, ऐसा विश्वास उन्होंने जताया. इस समय कुलगुरु के हाथों विश्वविद्यालय के यू-ट्यूब चैनल का उद्घाटन किया गया. स्थापना दिवस कार्यक्रम को कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी वी. टी. पाटिल, परीक्षा एवं मूल्यांकन मंडल के संचालक जी. आर. पलसे, विज्ञान एवं तकनीकी विद्याशाखा के अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य एवं प्रबंधन विद्याशाखा के अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, मानव्यविद्या विद्याशाखा के अधिष्ठाता डॉ. पी. आर. शेवाले, कौशल्य विकास केंद्र के समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, आयक्यूएसी संचालक डॉ. एम. एस. देशमुख, विद्यार्थी विकास विभाग के संचालक डॉ. आर. वी. गुरव, बै. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र की निदेशक डॉ. नमिता खोत, क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना के समन्वयक अभय जायभाये समेत अधिसभा सदस्य, प्रबंधन परिषद सदस्य, विद्या परिषद सदस्य, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी एवं कर्मचारी उपस्थित थे.

## रोशनी से जगमगाया विश्वविद्यालय

इस बीच स्थापना दिवस के अवसर पर पूरे विश्वविद्यालय पर विभिन्न तरह की रोशनी की गई. इस रंगबिरंगी रोशनी से पूरी विश्वविद्यालय की इमारत जगमगा उठी, जिससे पूरी इमारत मनमोहक दिखाई दे रही है.

# संशोधन क्षेत्रात सर्वतोपरी योगदान द्यावे : डॉ. शिर्के

## शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन दिन साधेपणाने साजरा

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आपला झेंडा जागतिक पातळीवर फडकविला आहे. विद्यापीठाचा संशोधन क्षेत्रातील लौकिक अधिक उंचावण्यासाठी संशोधक शिक्षक व विद्यार्थ्यांनी सर्वोतोपरी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी केले. शिवाजी विद्यापीठाचा ५८वा वर्धापन दिन बुधवारी कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात आला. विद्यापीठ प्रांगणात सकाळी ठीक साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. कुलगुरू डॉ. शिर्के व मान्यवरांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले व शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमानंतर युट्यूबद्वारे ऑनलाइन स्वरुपात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सर्वांशी संवाद साधून शुभेच्छा दिल्या. त्यावेळी शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह विद्यापीठावर प्रेम करणाऱ्या सर्वच समाजघटकांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



### रोषणाईने झगमगले विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने मुख्य प्रशासकीय इमारत तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा असणारा उद्यान परिसर याठिकाणी अत्यंत आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दीपावली आणि वर्धापन दिन असा योग या निमित्ताने जुळून आला. सध्या कोविड-१९मुळे विद्यापीठ परिसरात अभ्यागतांना प्रवेश करता येत नसला तरी मुख्य इमारतीसमोरून या रोषणाईचे नेत्रसुखद दर्शन नागरिकांनी रात्री घेतले.



## 'शिव वार्ता' युट्यूब चॅनलचे कुलगुरूंच्या हस्ते लोकार्पण

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कोविड-१९चे धोके टाळण्यासाठी विद्यापीठाने साध्या पद्धतीने वर्धापन दिन साजरा करण्याचे ठरविले.
- विद्यार्थ्यांविना साजरा होणारा हा वर्धापन दिन वेगळा आहे.
- कोविड-१९ने आपल्यातल्या क्षमता व मर्यादांची जाणीव करून दिलेली आहे.
- विशेषत: ऑनलाइन शिक्षणाच्या बाबतीत.
- या ऑनलाइन अध्ययन-अध्यापन प्रणालीपासून सुटका होऊन प्रत्यक्ष अध्यापन प्रक्रियेस लवकरात लवकर सुरवात होईल, अशी अपेक्षा आहे.
- विद्यापीठ अनुदान आयोग आणि महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सूचनांबरहुकूमच आपल्याला टप्प्याटप्प्याने अनलॉकची प्रक्रिया राबवावयाची आहे. या प्रक्रियेदरम्यान विद्यापीठ व महाविद्यालये विविध उपक्रम घेऊन सामोरे येतील, ज्यायोगे शिकणे व शिकवणे अधिक सुलभ होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.
- सदर कार्यक्रमानंतर शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव वार्ता'या युट्यूब चॅनलचे लोकार्पण कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या दालनामध्ये करण्यात आले.
- वर्धापन दिन कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर.के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, डॉ. पी.आर. शेवाळे, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. एम.एस. देशमुख, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. नमिता खोत, पी.टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये यांच्यासह अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्या परिषद सदस्य, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# संशोधन क्षेत्रात सर्वतोपरी योगदान द्यावे : डॉ. शिर्के

## शिवाजी विद्यापीठाचा वर्धापन दिन साधेपणाने साजरा

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संशोधनाच्या क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी आपला झेंडा जागतिक पातळीवर फडकविला आहे. विद्यापीठाचा संशोधन क्षेत्रातील लौकिक अधिक उंचावण्यासाठी संशोधक शिक्षक व विद्यार्थ्यांनी सर्वोतोपरी योगदान द्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी केले. शिवाजी विद्यापीठाचा ५८वा वर्धापन दिन बुधवारी कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात आला. विद्यापीठ प्रांगणात सकाळी ठीक साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत सादर केले. कुलगुरू डॉ. शिर्के व मान्यवरांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले व शिवपुतळ्यास अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमानंतर युट्यूबद्वारे ऑनलाइन स्वरुपात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सर्वांशी संवाद साधून शुभेच्छा दिल्या. त्यावेळी शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह विद्यापीठावर प्रेम करणाऱ्या सर्वच समाजघटकांप्रती त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.



### रोषणाईने झगमगले विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने मुख्य प्रशासकीय इमारत तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा असणारा उद्यान परिसर याठिकाणी अत्यंत आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दीपावली आणि वर्धापन दिन असा योग या निमित्ताने जुळून आला. सध्या कोविड-१९मुळे विद्यापीठ परिसरात अभ्यागतांना प्रवेश करता येत नसला तरी मुख्य इमारतीसमोरून या रोषणाईचे नेत्रसुखद दर्शन नागरिकांनी रात्री घेतले.



### 'शिव वार्ता' युट्यूब चॅनलचे कुलगुरूंच्या हस्ते लोकार्पण

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कोविड-१९चे धोके टाळण्यासाठी विद्यापीठाने साध्या पद्धतीने वर्धापन दिन साजरा करण्याचे ठरविले.
- विद्यार्थ्यांविना साजरा होणारा हा वर्धापन दिन वेगळा आहे.
- कोविड-१९ने आपल्यातल्या क्षमता व मर्यादांची जाणीव करून दिलेली आहे.
- विशेषतः ऑनलाइन शिक्षणाच्या बाबतीत.
- या ऑनलाइन अध्ययन-अध्यापन प्रणालीपासून सुटका होऊन प्रत्यक्ष अध्यापन प्रक्रियेस लवकरात लवकर सुरवात होईल, अशी अपेक्षा आहे.
- विद्यापीठ अनुदान आयोग आणि महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शक सूचनांबरहुकूमच आपल्याला टप्प्याटप्प्याने अनलॉकची प्रक्रिया राबवावयाची आहे. या प्रक्रियेदरम्यान विद्यापीठ व महाविद्यालये विविध उपक्रम घेऊन सामोरे येतील, ज्यायोगे शिकणे व शिकवणे अधिक सुलभ होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.
- सदर कार्यक्रमानंतर शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव वार्ता'या युट्यूब चॅनलचे लोकार्पण कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या दालनामध्ये करण्यात आले.
- वर्धापन दिन कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर.के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, डॉ. पी.आर. शेवाळे, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. एम.एस. देशमुख, डॉ. आर.व्ही. गुरव, डॉ. नमिता खोत, पी.टी. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये यांच्यासह अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, विद्या परिषद सदस्य, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.